# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१३/२०२५

श्री.सुरेश नामदेव दांडगे
रा.किसाननगर पुर्व रस्ता क्रं.८, इस्लामपूर,
ता.वाळवा, जि.सांगली — तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव,
ता.वाळवा, जि.सांगली.

२. कासेगाव एज्युकेशन सोसायटी, कासेगाव,
ता.वाळवा, जि.सांगली.

— वि.प.

कासेगाव एज्युकेशन सोसायटी, कासेगाव, ता.वाळवा, जि.सांगली या शिक्षण संस्थेचे आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, ता.वाळवा, जि.सांगली येथील सहा.प्राध्यापक श्री.सुरेश नामदेव दांडगे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१२/०९/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार श्री.सुरेश नामदेव दांडगे यांनी तक्रार अर्जात विस्तृत तक्रार नमूद केली आहे. सदर तक्रार थोडक्यात अशी, तक्रारदार हे जाबदार महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदावर सन २०११ पासून सेवेत असून ते ॲकेडमिक लेव्हल १२ ते १३ एजीपी ९००० या पदाकरिता दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र होत होते. याबाबत त्यांनी दि.१२/१२/२०२४ रोजी मा.उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ यांचेकडे रितसर प्रस्ताव सादर केला होता. विद्यापीठाने दि.१८/१२/२०२४ रोजीच्या पत्राव्दारे जाहिर केलेल्या वेळापत्रकानुसार तक्रारदार यांची दि.३०/१२/२०२४ रोजी मुलाखत घेवून पदोन्नती मंजूर झाल्याचे तक्रारदार यांना दि.१४ जानेवारी २०२५ रोजी पत्राव्दारे कळविले. त्यानंतर तक्रारदार यांनी सदर पत्र प्राप्त होताच दि.१६ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयामार्फत त्यांच्या स्थाननिश्चितीचा प्रस्ताव दि.३०/१२/२०२४ या दिनांकाऐवजी दि.०१/०१/२०२५ असा बदल करण्याची विनंती केली होती. तसेच दि.१६ जानेवारी २०२५ रोजीच त्यांच्या महाविद्यालयामार्फत चेंजिस इन स्टाफ च्या मान्यतेसाठी परिपुर्ण प्रस्ताव सादर केला होता. तसेच प्रस्ताव सादर केल्यानंतर अशी विनंती

दि.२३/०१/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे विद्यापीठास केली होती. या दरम्यान मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग आणि लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान कोल्हापूर यांनीही त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या वेतननिश्चितीस दि.०१/०१/२०२५ ने मान्यता दिली असून त्यांना ॲकेडमिक लेव्हल १३ ए (एजीपी ९०००) नुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

जाबदार महाविद्यालयाकडून पत्राव्दारे तक्रारदार यांच्या स्थाननिश्चितीच्या दिनांकामध्ये ३०/१२/२०२४ ऐवजी दि.०१/०१/२०२५ असा बदल करून मिळणचे केलेली विनंतीचा विद्यापीठाने कोणताही विचार केला नाही. तसेच तक्रारदार यांना बाजू मांडण्याची कोणतीही संधी न देता जवळपास सात महिन्याचा कालावधी उलटून गेल्यानंतर दि.२१/०७/२०२५ रोजीच्या पत्राव्दारे तक्रारदार यांची ॲकेडमिक लेव्हल १३ ए स्टेज ४ ची सहयोगी प्राध्यापक पदावरील मान्य केलेली पदोन्नती रदद केल्याबाबत कळविण्यात आले. याबाबत तकारदार यांना ते पदोन्नतीस दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र होते याची कल्पना देणे आवश्यक होते, ते दि.३०/१२/२०२४ रोजी मुलाखतीलस पात्र नसताना हजर राहीले, तसेच दुरध्वनीव्दारे वारंवार कळवूनही मान्यतेच्या मूळ प्रती त्यांनी विद्यापीठ कार्यालयात जमा केल्या नाहीत अशी प्रमुख तीन कारणे देण्यात आली असल्याचे तक्रारीत नमूद करून विद्यापीठाने दि.२१ जुलै २०२५ रोजीचे दिलेले पत्र रदद करून त्यांची पदोन्नती दि.०१/०१/२०२५ पासून सलग ठेवण्याबाबत आदेश देण्यात यावेत अशी मागणी केली आहे.

**शिवाजी विद्यापीठ संलग्नता टी. १ विभागाचा अभिप्राय-**

१. डॉ. सुरेश नामदेव दांडगे यांची दि.०१/०१/२०११ रोजीची नेमणूक आहे. त्यांनी दिनांक १३/०६/२००२ रोजी नेट व दिनांक १८/०१/२०२३ रोजी पीएच.डी. पदवी धारण केली आहे. त्यानुसार त्यांना स्टेज-२ ही पात्र दि. ०१/०१/२०१७ रोजी व स्टेज-३ ही पात्र दि. ०१/०१/२०२२ रोजी देण्यात आलेली आहे.

२. या कार्यालयामार्फत दि. २३ ते ३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत स्टेज-४ व स्टेज-५ मधील प्राप्त प्रस्तावांचे कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये एकूण १२१ प्रस्ताव होते. त्यामध्ये डॉ. सुरेश नामदेव दांडगे (विषय - इतिहास) यांचा स्टेज -४ सहायक प्राध्यापक पदासाठी प्रस्ताव होता.

शिवाजी वि
तक्रार
निवारण
समिती
कोल्ह

३. जेव्हा या कार्यालयामार्फत स्थाननिश्चिती शिबीराचे वेळापत्रक जाहिर करण्यात आले, त्यावेळी त्यामध्ये डॉ. दांडगे यांची मुलाखत दि.३०/१२/२०२४ यादिवशी होती. डॉ. दांडगे हे दि. ३०/१२/२०२४ रोजी मुलाखतीस उपस्थित राहिले व मुलाखत दिली.

४. डॉ. दांडगे हे सहयोगी प्राध्यापक पदासाठी दि. ०१/०१/२०२५ रोजी पात्र आहेत, ही बाब त्यांनी दि.३०/१२/२०२४ रोजी मुलाखतीवेळी समितीच्या/कार्यालयाच्या निदर्शनास आणले नाही. तसेच डॉ.दांडगे हे दि. ०१/०१/२०२५ रोजी पात्र आहेत, ही बाब छाननीवेळी तज्ञांच्या व मुलाखती नियोजनापूर्वी विभागाच्या व मुलाखतीवेळी निवड समितीच्याही निदर्शनास आली नाही, त्यामुळे दि.०८/०३/२०१९ च्या शासननिर्णयातील तरतुदीनुसार कॅस निवड समितीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.३०/१२/२०२४ पासून डॉ. दांडगे यांना सहयोगी प्राध्यापक पदाची मान्यता अनावधानाने देण्यात आली.

५. तद्नंतर मा. विभागीय सहसंचालक कार्यालयाकडून तात्काळ दि. १६/०१/२०२५ रोजीच्या पत्राने डॉ. दांडगे यांची वेतननिश्चिती ही विद्यापीठ मान्यतेप्रमाणे दि. ३०/१२/२०२४ रोजी न घेता, दि. ०१/०१/२०२५ रोजीपासून करण्यात आलेली आहे.

६. प्राचार्य, आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कासेगाव, ता. वाळवा, जि. सांगली यांनी दि.२३/०१/२०२५ च्या पत्राने डॉ. दांडगे हे सहयोगी प्राध्यापक पदासाठी दि.०१/०१/२०२५ पासून पात्र होत असल्याने त्यांची चेंजिस इन स्टाफ मान्यता दि. ३०/१२/२०२४ ऐवजी दि. ०१/०१/२०२५ पासून बदलून मिळण्याबाबत विनंती केली.

७. डॉ. दांडगे यांचा चेंजिस इन स्टाफ मान्यता मिळणेसाठीच्या दि. १६/०१/२०२५ रोजीच्या पत्रास या कार्यालयाकडून दि. २३/०५/२०२५ च्या पत्राने सहयोगी प्राध्यापक पदाच्या ॲकेडेमिक लेव्हल १३ ए स्थाननिश्चिती दिनांकामध्ये योग्य ते बदल करून चेंजिस इन स्टाफ मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा असे महाविद्यालयास कळविण्यात आले.

८. डॉ. दांडगे यांच्या महाविद्यालयाचे दि. १६/०१/२०२५ रोजीचे पत्र या कार्यालयास आवक क्र. २८५ दि. २४/०१/२०२५ रोजी प्राप्त झाले. तसेच महाविद्यालयाचे दि. २३/०१/२०२५ रोजीचे पत्र आवक क्र. २८६ दि. २४/०१/२०२५ रोजी प्राप्त झाले. सदरच पत्रे प्राप्त झाल्यानंतर डॉ. दांडगे हे

दि. ०१/०१/२०२५ रोजी सहयोगी प्राध्यापक पदासाठी पात्र असल्याची बाब कार्यालयाच्या निदर्शनास आल्याने, या विभागाच्या दूरध्वनीद्वारे डॉ. दांडगे यांना फोन करून सदरची बाब नजरचूकीने व अनावधानाने घडलेली आहे. त्यामुळे आपणास प्राप्त झालेली मूळ पत्रे (डॉ. दांडगे यांना देण्यात आलेले व त्यांच्या महाविद्यालयास देण्यात आलेले) त्वरीत कार्यालयास जमा करा, असे सांगितले. तेव्हा डॉ. दांडगे यांनी सदरची दोन्ही पत्रे लगेच परत करतो, असे विश्वासपूर्वक दूरध्वनीवर सांगितले. त्यामुळे डॉ. दांडगे व त्यांच्या महाविद्यालयास लेखी पत्र पाठवून, डॉ.दांडगे यांना देण्यात आलेली मूळ पत्रे परत करण्याबाबत कळविण्यात आले नाही.

९. त्यानंतर संलग्नता टी १ विभागाकडून दुरध्वनीव्दारे डॉ.दांडगे यांच्याशी संपर्क साधून सदरची बाब अनावधानाने व नजरचुकीने झालेली आहे. त्यामुळे डॉ.दांडगे यांना देण्यात आलेली मूळ पत्रे कार्यालयात जमा करण्याबाबत विनंती केली. तथापि, त्यांनी ती परत केली नाहीत. त्यामुळे प्रशासकीय मान्यतेने दि.२१/०७/२०२५ रोजीच्या पत्राने डॉ.दांडगे यांना त्यांचे मान्यता पत्र रदद करण्यात आल्याचे कळविण्यात आले. शासन निर्णय दि.०८/०३/२०१९ मधील ७.३(६) मधील तरतूदीनुसार तसेच दि.१०/०५/२०१९ मधील सुधारीत तरतूदीनुसार सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांना कॅसचे लाभ कॅस निवड समितीच्या दिनांकापासून देण्याची तरतूद आहे. तसेच डॉ.दांडगे यांच्या प्रकरणी केलेली कार्यवाही नियमानुसार बरोबर आहे.

१०. डॉ.दांडगे यांनी त्यांना देण्यात आलेली सहयोगी प्राध्यापक पदाची मूळ मान्यतेची पत्रे कार्यालयास जमा न केल्याने याबाबत या कार्यालयाकडून दि.१६/०७/२०२५ रोजी टिपणी सादर करण्यात आली, सदर टिपणीवरील आदेशानुसार या कार्यालयाकडून दि.२१/०७/२०२५ रोजीच्या पत्राने त्यांचे मान्यता पत्र रददबातल करून, दुरूस्ती पत्र पाठविण्यात आले.

११. तदनंतर डॉ.दांडगे यांनी दि.११/०८/२०२५ रोजीच्या पत्राने महाविद्यायास दिलेली सविस्तर माहिती/खुलासा महाविद्यालयाने दि.१२/०८/२०२५ च्या पत्राने खालीलप्रमाणे या विभागास पाठवून दिला. महाराष्ट्र शासनाच्या दि.०८/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील ७.३ VI मधील तरतूद खालीलप्रमाणे-

(i) if a candidate applies for promotion on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be from that of minimum period of eligibility.

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. MISC-2018/C.R.56/18/JNI-1 दि.१०/०५/२०१९ नुसार खालीलप्रमाणे तरतूद ही लागू होते.

7.3 VI.i. If a candidate applies for promotion from Level 12 to 13A and Level 13A to Level 14 on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be the date of promotion shall be the date of selection by CAS for both Colleges and Universities.

१२. विद्यापीठ कार्यालयाकडून दि.२३ डिसेंबर, २०२४ ते दि.३१ डिसेंबर, २०२४ या कालावधीत सदर स्थाननिश्चिती शिबिराचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये डॉ. दांडगे यांचा प्रस्ताव होता. जेव्हा या कार्यालयामार्फत स्थाननिश्चिती शिबिराचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले, त्यावेळी त्यामध्ये डॉ.दांडगे यांची मुलाखत दि.३०/१२/२०२४ या दिवशी होती. सदरचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर डॉ.दांडगे यांनी त्यावेळीच आपण दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र आहोत, दि.३०/१२/२०२४ रोजी नाही, ही बाब कार्यालयाच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते. तसेच डॉ.दांडगे हे दि.३०/१२/२०२४ रोजी मुलाखतीस उपस्थित राहीले, मुलाखत दिली, त्यावेळीही त्यांनी मौखीकरित्या आपण दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र आहोत, हे समितीच्या निदर्शनास आणले नाही.

तसेच डॉ.दांडगे हे दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र आहेत, ही बाब समितीच्याही निदर्शनास आली नाही, त्यामुळे दि.०८/०५/२०१९ च्या तरतुदीनुसार कॅस निवड समितीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.३०/१२/२०२४ पासून त्यांना अनावधानाने मान्यता देण्यात आली.

**समितीची निरीक्षणे:-**

तक्रारदार यांच्या तक्रारीमधून त्यांची Academic Level 12-13AGP 9000 या पदाकरीता दि.०१/०१/२०२५ रोजी ते पात्र होत होते. त्याचा रितसर प्रस्ताव पाठवून विद्यापीठाने वेळापत्रकानुसार तक्रारदार यांची दि. ३०/१२/२०२४ रोजी मुलाखत घेवून पदोन्नती मंजूर झाल्याचे तक्रारदार दि. १४/०१/२०२५ रोजी पत्राद्वारे कळविले होते, तथापि तक्रारदार यांनी स्थाननिश्चितीचा प्रस्ताव दि. ३०/१२/२०२४ या दिनांकाऐवजी दि.०१/०१/२०२५ असा बदल करण्याची विनंती केली. त्या विनंतीस विद्यापीठाने कोणताही विचार न करता सात महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतर मान्य केलेली पदोन्नती रद्द केली. यामध्ये तक्रारदार यांना बाजू मांडण्याची कोणतीही संधी उपलब्ध केलेली नाही. तक्रारदार यांच्या या तक्रारीस संस्था व महाविद्यालयाने आक्षेप घेतलेला नाही व केलेली कार्यवाही

या समिती समोर सादर केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नता टी.१ विभागाने तक्रारदाराच्या तक्रारीबाबत विस्तृत मुद्देनिहाय अभिप्राय देवून तक्रारीस हरकत घेतली आहे.

तक्रारदार यांच्या मते, दि. ०८/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील पान नं. ३० वरील 7.3(vi) या तरतूदीनुसार सहयोगी प्राध्यापक पदासाठी पात्र होण्याअगोदर तीन महिने कॅस अंतर्गत पदोन्नतीचा प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयाकडे सादर करू शकतो. या नियमानुसार त्यांनी परिपूर्ण प्रस्ताव १९ दिवस अगोदर सादर केला होता. विद्यापीठाच्या नियोजनाप्रमाणेच आणि विद्यापीठाने जाहिर केलेल्या नियमानुसार दि. ३०/१२/२०२४ रोजी झालेल्या मुलाखतीमध्ये प्रस्ताव मंजूर होवून माझ्या पदोन्नतीस मान्यता मिळाली. तसेच विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर आणि मा. लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी माझी पदोन्नती पात्रता दि. ०१/०१/२०२५ पासून मान्यही केली आहे. सबब दि.०८/०३/२०१९ रोजीच्या महाराष्ट्र शासन निर्णयातील 7.3(vi) (ii) त्यांना लागू असून त्यांची पात्रता दि. ०१/०१/२०२५ नमूद होणे आवश्यक आहे. तक्रारदार यांनी सहयोगी प्राध्यापक पदाच्या पदोन्नतीसाठी दि. ०१/०१/२०२५ रोजी पात्र होत असल्याबाबत प्रस्तावात नमूद केले होते. परंतु विद्यापीठाने त्यांच्या सहयोगी प्राध्यापक पदाचा दि. ३०/१२/२०२४ ऐवजी दि. ०१/०१/२०२५ करण्याचे अमान्य केले. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नता टी.१ विभाग यांनी तक्रारदार यांना दिलेल्या मान्यतेची बाब प्रामाणिकपणे मान्य केली. परंतु ती नजरचूकीने व अनावधानाने चूक झाल्याचे या समितीसमोर मांडले.

तक्रारदार दि. ०१/०१/२०२५ रोजी पात्र आहेत, ही बाब छाननीवेळी तज्ञांच्या व मुलाखती नियोजनापूर्वी विभागाच्या व मुलाखतीवेळी निवड समितीच्याही निदर्शनास आली नाही, त्यामुळे दि.०८/०३/२०१९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कॅस निवड समितीच्या दिनांकापासून म्हणजेच दि.३०/१२/२०२४ पासून डॉ. दांडगे यांना सहयोगी प्राध्यापक पदाची मान्यता अनावधानाने देण्यात आली. याबाबत विभागाने दूरध्वनीद्वारे तक्रारदार यांना वारंवार फोन करून मूळ पत्रे सादर करण्यास सांगितली. तक्रारदार यांनी दूरध्वनीवरून कागदपत्रे परत करण्याबाबत सकारात्मक बोलत होते परंतु त्यांनी मूळ पत्रे विभागाकडे परत केली नाहीत. तक्रारदार व महाविद्यालयास दूरध्वनीवरून वारंवार कळविण्यात आल्याचे संलग्नता विभाग यांनी या समितीसमोर मांडले. त्यामुळे तक्रारदार व महाविद्यालयास लेखी पत्र पाठविण्यात आले नसल्याचे कारण सांगितले.

शेवटी मूळ पत्रे प्राप्त न झाल्याने विभागाने तक्रारदार यांचे प्रकरणी महाराष्ट शासनाच्या दि. ०८/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील 7.3(vi) (i) -

(i) if a candidate applies for promotion on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be from that of minimum period of eligibility.

उपरोक्त तरतूदीनुसार, जर एखादा उमेदवार किमान पात्रता कालावधी पूर्ण झाल्यावर पदोन्नतीसाठी अर्ज करतो आणि यशस्वी होतो. तर पदोन्नतीची तारीख किमान पात्रता कालावधीच्या तारखेपासून मोजली जाईल.

पुढे संलग्नता टी.१ विभागाच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. MISC-2018/C.R.56/18/JNI-1 दि.१०/०५/२०१९ नुसार खालीलप्रमाणे तरतूद ही लागू होते.

7.3VI.i. If a candidate applies for promotion from Level 12 to 13A and Level 13A to Level 14 on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be the date of selection by CAS for both Colleges and Universities.

जर एखादा उमेदवार किमान पात्रता कालावधी पूर्ण झाल्यावर स्तर १२ वरून १३ वर आणि स्तर १३ वरून स्तर १४ वर पदोन्नतीसाठी अर्ज करतो आणि यशस्वी होतो. तर महाविद्यालये आणि विद्यापीठे या दोन्हीसाठी पदोन्नतीची तारीख ही CAS द्वारे निवडीची तारीख असेल.

तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार दि. १०/०५/२०१९ या शासन निर्णयामधील 7.3(vi)(i) हा नियम तक्रारदार यांना लागू होत नाही व त्याआधारे माझी पदोन्नती करणे अन्यायकारक, अपरिमित हानिकारक व बेकायदेशीर आहे.

उपरोक्त दोन्ही तरतूदी अवलोकनी घेतल्यास शासन निर्णय दि. ०८/०३/२०१९ मधील ७.३ (vi) (i) यानुसार संबंधित उमेदवाराने किमान पात्रता कालावधी पूर्ण झाल्यावर पदोन्नती अर्ज केल्यास, असे स्पष्ट नमूद केले आहे याचाच अर्थ उमेदवाराने किमान पात्रता कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे असे स्पष्ट होते. तसेच दि.१०/०५/२०१९ रोजीच्या तरतूदीनुसार सुधारीत शासन निर्णयातील ७.३ VI.I. नुसार देखील किमान पात्रता कालावधी पूर्ण करणेची आवश्यक बाब दिसून येते. संलग्नता टी. १ विभागाच्या म्हणण्यानुसार तक्रारदार यांचा किमान पात्रता कालावधी दि.०१/०१/२०२५ रोजी

पूर्ण होतो. तक्रारदार दि.०१/०१/२०२५ रोजी पात्र होता ही बाब तक्रारदारानेही मान्य केली आहे. सबब कॅस अंतर्गत पदोन्नतीकरीता शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान पात्रता कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवार पदोन्नतीसाठी पात्र होतो. सबब विद्यापीठाच्या संलग्नता टी.१ विभागाच्या म्हणण्यामध्ये तथ्य दिसून येते. दि.१०/०३/२०१९ रोजीच्या शुध्दिपत्रकातील तरतूदीनुसार पदोन्नतीसाठीचा विहित कालावधी पूर्ण झाल्याशिवाय उमेदवाराला पदोन्नतीचा लाभ देणे उचित होणार नाही. विद्यापीठाने जरी मुलाखत किमान पात्रता कालावधी पूर्ण होण्यापूर्वी घेतली असेल तरी ती तांत्रिक चूक होवून व त्या चूकीमुळे झालेली मुलाखत पदोन्नतीसाठी वैध समजता येणार नाही, असे या समितीचे सर्वानुमते मत आहे. सबब, तक्रारदार यांची दि.३०/१२/२०२४ रोजी झालेली मुलाखत ही नियमबाहय असून त्यांना त्याचा लाभ देता येणार नाही.

## आदेश

१. तक्रारदार यांचा तक्रार अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२. विद्यापीठ कार्यालयाकडून तक्रारदार यांना देण्यात आलेला दि.२१/०७/२०२५ रोजीचा आदेश कायम करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 07 MAY 2026

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.ए.बी.साळी )

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)